दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २४६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.६ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# सहलीची बस ३०० फूट दरीत कोसळली ; २८ पेणचे विद्यार्थी बचावले

**दै.रायगड नगरी । पेण**

**पेण येथून लोहगड सहलीसाठी गेलेल्या खासगी क्लासच्या बसचा आज भीषण अपघात झाला. लोहगड पर्यटन करून परत येताना दुधिवरे खिंडीजवळ एका अवघड वळणावर ब्रेक फेल झाल्याने चालकाचे वेगावरील नियंत्रण सुटले आणि बस ३०० फूट दरीत कोसळली. केवळ दैव बलवत्तर म्हणून बसमधील २८ विद्यार्थी व ३ शिक्षक बालबाल बचावले. यांतील पाच विद्यार्थी जबर जखमी असून त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. तीन बस मध्ये एकूण ८८ विद्यार्थी होते. त्यापैकी MH06S9381 ह्या क्रमांकाच्या एका बसला अपघात झाला.**



पेण शहरातील साठे क्लासेसमधील ८८ विद्यार्थी आणि ७ शिक्षक असे एकूण ९५ जण मावळ तालुक्यातील लोहगड येथे खासगी बसने सहलीसाठी गेले होते. रविवार सुट्टी असल्याने दिवसभर किल्ले लोहगड परिसरात पर्यटन केले. सायंकाळी पाचनंतर माघारी परत येताना बस क्रमांक MH06S9381 या बसला दुधिवरे खिंडीजवळ भीषण अपघात झाला. एका अवघड वळणावर बसचे ब्रेक फेल झाल्याने चालकाचे वेगावरील नियंत्रण सुटले आणि बस रस्ता सोडून तब्बल तीनशे फूट खोल दरीत कोसळली. भीषण अपघात होऊनही मुले म्हणजे देवा घरची फुले प्रमाणे केवळ दैव बलवत्तर म्हणून मोठी जीवितहानी टळली.

या अपघातात बसचा ड्रायव्हर जितेंद्र परशुराम पाटील वय ४२ रा.शिर्कि, राजेश मोहन म्हात्रे वय २५ रा.लाखोले, मनस्विनी तेजस मनकवडे वय ११ रा.झीराळआळी, प्रज्ञा धीरज पाटील वय १३ रा.चावडी नाका, इशांन समीर मनकामे वय १२ रा.चावडीनाका, सौ.स्नेहा सुमन गोखले वय ३६ रा.चावडी नाका, आदिती विष्णू देवधर वय १४ रा.पेण, शिवम संतोष कदम वय २२ रा.पेण, पूजा गजानन पाटील वय १७ रा.प्रभूआळी सर्व तालुका पेण हे हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असून याव्यतिरिक्त अन्य ६ मुलांना किरकोळ खरचटलेले असून त्यांना ड्रेसिंग करून घरी सोडून देण्यात आले.

याचवेळी लोहगड घेरेवाडी येथील स्थानिक तरुण, लोणावळा येथील शिवदुर्ग मित्र मंडळाचे कार्यकर्ते आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मदत आणि बचावकार्य सुरू केले. पाच जखमी विद्यार्थ्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्या प्रकृतीचा धोका टळला आहे. पेण मधील विद्यार्थ्यांचा लोहगड येथे अपघात झाल्याचे समजतात पेणचे उद्यो-जक राजू पिचिका यांनी क्षणाचाही विलंब न लावता अपघात झाल्याच्या ठिकाणावर रुग्णवाहिका पाठवून सर्व जखमी विद्यार्थ्यांना अधिक उपचारासाठी पेण व परिसरातील रुग्णालयात दाखल केले.

# मिरची पूड डोळ्यात टाकून सोनाराला लुटण्याचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानात सोने खरेदी करण्याच्या बहाण्याने आलेल्या दोन अनोळखी इसमांनी सोनाराच्या डोळ्यात मिरची पूड टाकून दुकानातील सोन्याच्या दागिन्यांचा बॉक्स घेऊन पळून जाण्याच्या प्रयत्नांत असताना दुकान मालकाने आरडाओरडा केल्याने आजूबाजूच्या लोकांनी त्यांचा पाठलाग केल्याने आरोपींनी तो दागिन्यांचा बॉक्स दुकाना बाहेर टाकून पळ काढण्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.




मुस्तकीम नुरुल तरफदार ( वय ५१ ) यांचे जैन मंदिरा जवळ एम. एम. ज्वेलर्स या नावाने दुकान आहे. सदर दुकानात ते बसले असतांना दोन अनोळखी इसम ग्राहक बनून त्यांच्या दुकानात आले व सोन्याचे दागिने पहात असताना अचानकपणे एका इसमाने त्यांच्या डोळ्यात मिरची पूड टाकून दुकानातील सोन्याच्या दागिन्यांचा बॉक्स घेऊन पळून जाण्याच्या प्रयत्न दोघांनी केला असता दुकान मालकाने आरडाओरडा केल्याने आजूबाजूच्या लोकांनी त्यांचा पाठलाग केल्याने आरोपींनी तो दागिन्यांचा बॉक्स दुकाना बाहेर टाकून पळ काढण्याची घटना घडली आहे. याची नोंद पनवेल पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त

# सामाजिक न्याय विभागातर्फे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सामाजिक न्याय विभागातर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी शिवाजीपार्क, मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विनम्र अभिवादन करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग श्रीमती वंदना कोचुरे यांनी दिली.



सामाजिक न्यायविभागातर्फे दिनांक २६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या समता पर्व या उपक्रमातंर्गत जिल्हा स्तरावर सहाय्यक आयुक्त व जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांच्या मार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

दिनांक ५ व ६ रोजी दादर येथील शिवाजीपार्क येथे राज्याभरातून येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्याकरीता विविध महामंडळे, सफाई आयोग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी पार्क येथे प्रसिध्दी स्टॉल उभारण्यात येणार असून एल.ई.डी. स्क्रीनद्वारे जनसामान्यांना योजनांची माहिती देण्यात येणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे यांच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्याच्या विविध ठिकाणांहून, खेडोपाड्यातून येणाऱ्या अनुयायांसाठी मोफत भोजन देण्यात येणार आहे. शिवाजी पार्क येथे होणाऱ्या या अभिवादन कार्यक्रमास मुंबई शहरचे पालकमंत्री दिपक केसरकर, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# महाविकास आघाडीकडून १७ डिसेंबरला महामोर्चा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

राज्याचे राज्यपाल आणि सत्ताधाऱ्यांकडून महाराष्ट्राचा सातत्याने अपमान होत आहे, शिवरायांच्याबद्दल बेताल वक्तव्य केलं जात आहे, सीमाभागातील गावांवर कर्नाटकडून दावा केला जात आहे. फुटीरतेची बीजं इथं पेरली जात आहेत. राज्यपालांना महाराष्ट्राची अस्मिता, महत्व कमी करायचे आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का बसत आहे. त्याविरोधात येत्या १७ तारखेला जिजामाता उद्यान ते आझाद मैदान असा भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली.



सोमवारी आगामी हिवाळी अधिवेशनात शिंदे-फडणवीस सरकारला घेरण्यासाठी महाविकास आघाडीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर महाविकास आघाडीने पत्रकार परिषद घेतली. यावेळी महाविकास आघाडीचा महामोर्चा १७ डिसेंबर रोजी मुंबईत काढण्याची घोषणा यावेळी उद्धव ठाकरे यांनी केली. उद्धव ठाकरे म्हणाले, राज्यात अस्तित्वात आलेल्या बेकायदेशीर सरकारमुळे राज्याची अस्मिता धुळीस मिसळत आहे. राज्यपालांच्या वक्तव्यामुळे महाराष्ट्राच्या प्रतिमेला तडे जात आहेत. तसेच कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या गावांवर दावा केला आहे. पुढच्या वर्षी कर्नाटकची निवडणूक असल्याने महाराष्ट्रातील गाव तोडणार का? या सगळ्यावरून राज्यात मुख्यमंत्री आहेत का असा प्रश्न पडतोय.

याचबरोबर, महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वक्तव्यामुळे महाराष्ट्राची अस्मिता, स्वाभिमान .../२

# दोन गावठी पिस्तुल चार काडतुसांसह एक आरोपी अटक

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत येथे दोन गावठी पिस्तुल चार जिवंत काडतुस जप्त करण्यात आली आहेत. कर्जत भिसेगाव येथील राहणारा आरोपी यशबीर नरेश चव्हाण याला ताब्यात घेण्यात आले आहे. ही दमदार कामगिरी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग एल सी बी च्या पथकाने केली आहे.

एल सी बी चे अधिकारी राजेश पाटील यांना त्यांच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार गावठी पिस्तुल विकण्यासाठी एक इसम कर्जत चार फाटा येथे येणार असल्याची माहिती देण्यात आली होती. त्या अनुषंगाने राजेश पाटील यांनी रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे व अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचला होता. यावेळी कर्जत भिषेगाव येथील फातिमा नगर येथे राहणारा आरोपी यशबीर नरेश चव्हाण याच्याकडे अधिकाऱ्यांना दोन .../२

# द्रोणगिरीचा ऑक्सिजन आई इन्फ्रा : विजय पाटकर

**दै.रायगड नगरी । उरण**

सध्याच्या महागाईच्या काळात घरांचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य माणसांना घर विकत घेणे परवडत नाही या सर्वांना पर्याय म्हणून स्वस्त दारात सामान्य नागरिकांना परवडणारे घर आता विकत घेता येईल ते हि आई इन्फ्रा मुळेच.

नवी मुंबईच्या द्रोणागिरी या भागात आई इन्फ्रा कंपनी नागरिकांना स्वस्त घरे देत आहे एवढंच नव्हे तर घर घेताना कर्जाची तरतूद सोप्या पद्धतीने कसे होईल याची देखील काळजी आई इन्फ्रा घेत आहे. आता पर्यंत ५०० च्या वर घरे नागरिकांना दिली आहेत. आणि आता आई इन्फ्रा कंपनीने एक पाऊल पुढे टाकले असून द्रोणगिरीच्या सेक्टर १५ मध्ये प्लॉट क्रमांक १२२ येथे साई शिल्प या सातमजली इमारतीचे भूमी पूजन सुप्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक विजय पाटकर यांच्या हस्ते करण्यात आले.



या प्रसंगी विजय पाटकर जनतेशी संवाद साधताना म्हणाले कि आज पर्यंत साई इन्फ्रा ऐकले आहे. आई इन्फ्रा हे प्रथमच ऐकतो आहे. स्व:कष्टाने नरसू पाटील यांनी आईच्या नावाने स्थापन केलेली आई इन्फ्रा कंपनी कधीच अपयशी ठरणार नाही. आत्ता पर्यंत ५०० च्या वर कुटुंबाना घरे देऊन जो विश्वास आई इन्फ्राने मिळवला आहे. तोच विश्वास पुढे कायम ठेऊन आई इन्फ्राच्या आगामी प्रोजेक्ट मध्ये गुंतवणूक करा आणि हक्काचे घर मिळावा असे अवाहन विजय पाटकर यांनी केले.



# पनवेल तालुक्यातील ७०० पेक्षा जास्त स्कूल व्हॅन बंद राहणार

## शाळांचे संमती पत्र आणि परवाना नुतनीकरणाच्या प्रश्नावरून पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेचा आमरण उपोषणाचा इशारा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर आणि तालुक्यातील सुमारे ७०० पेक्षा जास्त स्कूल व्हॅन ६ डिसेंबर पासून बंद ठेवण्यात येणार आहेत. शाळांचे संमती पत्र आणि परवाना नूतनीकरणाचा प्रश्न निर्माण झाल्याने गेल्या काही महिन्यांपासून अनेक अडचणी निर्माण होत आहेत. यावर तोडगा निघत नसल्याने पनवेल विद्यार्थी वाहक संस्था आणि इतर संलग्न संघटनांच्या वतीने विद्यार्थी वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर संस्थापक अध्यक्ष पांडुरंग हुमणे व इतर विद्यार्थी वाहक आमरण उपोषण करणार आहेत.



पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात खाजगी शैक्षणिक संस्था आहेत. त्यामध्ये विशेष करून इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा सर्वाधिक समावेश आहे. सीबीएससी आणि स्टेट बोर्डच्या स्कूलमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेतात. स्कूल बसेस बरोबरच स्कूल व्हॅन ने विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण केले जाते. ओमिनी स्कूल व्हॅन मधून विद्यार्थी वाहतुकीला बारा-तेरा वर्षांपूर्वीच परवानगी देण्यात आले होते. अरुंद रस्त्यांमुळे बसेस ऐवजी व्हॅनला अधिक पसंती दिली जाते. या स्कूल व्हॅन परवानांचे नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. परंतु त्यासाठी शाळांच्या संमती पत्राची आवश्यकता निर्माण झाली आहे. पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून त्याशिवाय परवाने नूतनीकरण करण्यात येत नाहीत. शासनाचे निर्देश असतानाही खाजगी शिक्षण संस्थांकडून संमती पत्र देण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे. परिवहन समितीच्या बैठकीत आरटीओ शिक्षण विभागाकडून वारंवार सूचना देऊनही शाळा स्कूल व्हॅन चालकांना दाद देत नाहीत. पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांनी सातत्याने शाळा व्यवस्थापनाकडे पाठपुरावा केला. परंतु त्यांच्याकडून प्रतिसाद मिळत नसल्याने परवाना नूतनीकरणाचे काम थांबले आहे. त्यामुळे ७०० पेक्षा जास्त स्कूल व्हॅन विनापरवानाच विद्यार्थ्यांचे वाहतूक करीत आहेत. सुरक्षा दृष्टिकोनातून तसेच कायद्याच्या चौकटीत अशा प्रकारे विद्यार्थ्यांची ने आण करणे पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेला उचित वाटत नसल्याने आम्ही आता आंदोलनाच्या पवित्रात असल्याचे संस्थेचे खजिनदार किसन रौंदळ यांनी सांगितले. विद्यार्थी सुरक्षिततात संवाद परिषदेतही हा प्रश्न मार्गी न निघाल्यास सहा डिसेंबर रोजी आमरण उपोषणाचा इशारा पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या वतीने देण्यात आला होता. मात्र शाळा व्यवस्थापनाचे आडमुठे धोरण न बदलल्याने विद्यार्थी वाहकांनी आमरण उपोषणा बरोबरच मंगळापासून विद्यार्थी वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

# माथेरानमध्ये ई रिक्षाच्या सेवेला सुरुवात ; पर्यटकांमध्ये समाधान

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचा शोध १८५० मध्ये ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सर ह्युज मॅलेट यांनी लावल्यापासून याठिकाणी घोडा आणि हातरीक्षा हीच वाहतुकीची साधने अस्तित्वात आहेत परंतु नुकताच याठिकाणी उत्तम दर्जाचे क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते केल्यानंतर इथे पर्यावरण पूरक ई रिक्षा आजपासून सुरु करण्यात आली आहे त्यामुळे खऱ्या अर्थाने माथेरान हे सुंदर पर्यटनस्थळ प्रकाश झोतात येण्याच्या मार्गावर दिसत आहे.

आज येथील मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावर ई रिक्षाला आर टी ओ चे अधिकारी कदम आणि शालेय विद्यार्थ्याने हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला यावेळी ई रिक्षा साठी दहा वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करणारे निवृत्त शिक्षक सुनील शिंदे, प्रशासक सुरेखा भणगे, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, प्रेरणा सावंत, माजी उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, प्रकाश सुतार,प्रदीप घावरे, श्रमिक रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, अधिक्षक दीक्षांत देशपांडे, पोलीस निरीक्षक शेखर लव्हे,उप वन निरीक्षक उमेश जंगम, राजेंद्र मांडे यांसह नगरपरिषदेचे अधिकारी, नागरीक या ऐतिहासिक सुवर्ण क्षणांचे साक्षीदार होण्यासाठी मोठया संख्येने उपस्थित होते.

शालेय विद्यार्थ्यांना यासाठी केवळ पाच रुपये शुल्क तर पर्यटकांना ३५ रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. त्यामुळे पर्यटकांमध्ये या ई रिक्षाच्या स्वस्त आणि सुरक्षित प्रवासामुळे समाधान व्यक्त होत आहे.

यावेळी बोलताना प्रज्ञा गायतोंडे म्हणाल्या की, माथेरान मध्ये दस्तुरी पासून रेल्वे स्टेशन पर्यंत हॉटेल पर्यंत स्वस्तात आणि सुरक्षित वाहतुकीची सुविधा उपलब्ध नव्हती. आज याठिकाणी ई रिक्षा सारखा सुंदर प्रकल्प सुरू झाला आहे त्यामुळे खुप आनंद होत आहे.यानिमित्ताने आम्हाला खूपच कमी वेळात रेल्वे स्टेशन पर्यंत स्वस्तात ,सुरक्षित प्रवास करता आला आहे.

तर शाळा विद्यार्थी उमेर शेख म्हणाला की, आमची शाळा खूपच दूर आहे त्यामुळे माझे दप्तर कधी आईला तर कधी बाबांना घेऊन यायला लागत होते. येथील निवृत्त शिक्षक सुनील शिंदे यांनी ई रिक्षासाठी प्रयत्न केले होते त्यामुळेच ई रिक्षा सुरु झाली आहे. आता मला आणि सर्व शालेय विद्यार्थ्यांना आरामात या वाहनाच्या साहाय्याने प्रवास करता येणार आहे.

सदर प्रसंगी बोलताना माथेरानच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे म्हणाल्या की, ई रिक्षा सुरू होण्यासाठी जे सुप्रीम कोर्टाचे आदेश होते ते पूर्ण झाले आहेत पुढील काळात सर्वांनी या सेवेचा लाभ घ्यावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे.



# गुंतवणुकीचे आमिष दाखवून लाखो रुपयाची महिलेची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून १ लाख ३१ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेलमध्ये राहणाऱ्या नुना श्रीदुर्गा यांना इन्स्टाग्रामवर क्रिप्टो करन्सी अँड टेडिंगविषयी जाहिरात आली होती. यावेळी श्रीदुर्गा यांनी ट्रेडिंग करण्यास इच्छुक असल्याचे कळवले. त्यानुसार त्यांना सुरुवातीला दोन हजार रुपये गुंतवण्यास सांगितले. यावेळी सिक्युरिटी डिपॉझिटसाठी २० हजार पाठवावे लागतील, असे सांगण्यात आले. त्यानंतर तुम्हाला ४५ हजार मिळतील, असा मेसेज आला. त्यामुळे श्रीदुर्गा यांनी वीस हजार रुपये स्कॅन करून पाठवले. त्यानंतर ३० हजार रुपये व्यवहार फी भरावी लागेल असे सांगून त्याबदल्यात ८० हजार रुपये मिळणार असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी ३० हजार रुपये पाठवले. समोरील व्यक्तीने असे वारंवार पैसे भरण्यास सांगून श्रीदुर्गी यांच्याकडून १ लाख ३१ हजार ५९६ रुपये भरले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच श्रीदुर्गा यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# दुचाकीस्वाराची एकाला धडक ; एक ठार

**दै.रायगड नगरी । खोपोली**

जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गांवर हाळ बुद्रुक येथे एका वाटसरूला दुचाकीस्वाराने पाठीमागून धडक मारून जखमी केले. चौकहुन खोपोलीकडे जाणाऱ्या दुचाकी क्रमांक एमएच-४६, बीजे २८०९ यावरील चालकाने सोमवार दि. ५ डिसेंबर रोजी सकाळी ७. ४५ वाजेच्या सुमारास हाळ बुद्रुक येथे राहणारे ताहीर दुदुके (वय ५४ वर्ष) यांना पाठीमागून धडक दिल्याने दुदुके हे गंभीर जखमी झाले. दुदुके यांना पुढील उपचारासाठी खोपोली नगर परिषद रुग्णालय येथे दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान जखमी दुदुके यांचा मृत्यू झाला.

यानंतर सकाळी ११ ते ११.३० वाजेच्या सुमारास खालापूर येथील रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी मृतदेह पाठविण्यात आले. परंतु दुपारी २ वाजेपर्यंत पोस्टमार्टम झाले नव्हते. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित डॉक्टर उपलब्ध नसल्याने तसेच कागदपत्रांची पूर्तता न झाल्यानेही पोस्टमार्टमला उशीर लागला असल्याचे समजते. दरम्यान, याप्रकरणी खालापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## सशस्त्र सेना ध्वजदिन २०२२ निधी संकलन शुभारंभ

# कार्यक्रमाचे दि.७ डिसेंबर रोजी राजस्व सभागृहात आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील सशस्त्र सेना ध्वजदिन २०२२ निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन समिती डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मान्यतेने बुधवार दि.०७डिसेंबर २०२२ रोजी दुपारी १ वाजता राजस्व सभागृहामध्ये संपन्न होणार आहे.

हा कार्यक्रम जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन समिती डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.सोमनाथ घार्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्ह्यातील युध्द विधवा, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांना सन्मानित केले जाणार आहे. त्याचप्रमाणे सशस्त्र सेना ध्वजदिन २०२१ निधी संकलनाचे उत्कृष्ट कार्य केलेली कार्यालये, संस्था, व्यक्तींचाही प्रोत्साहनपर सन्मान करण्यात येणार आहे.

तरी माजी सैनिक, त्यांचे कुटुंबिय, नागरिक, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी केले आहे.

**नमुना एन.डी.**
**(नियम ९२ (३) पहा)**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/CC/AUTO/2018/3503 समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH 46 AZ 5298 चे मालक श्री.शैलेश नामदेव मोकल यांचे दि.१२/०८/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी श्रीमती शुष्मा शैलेश मोकल, पत्ता : अॅट-तरघर, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६. उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

याबाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या / प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**सही/-**
**उत्तराधिकाऱ्याचे नाव शुष्मा शैलेश मोकल**
**पत्ता : अॅट-तरघर, पो.उलवे,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

**नमुना एन.डी.**
**(नियम ९२ (३) पहा)**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/CC/AUTO/2018/5015 समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH 46 AZ 8915 चे मालक श्री.संजय गोसावी ठाकूर यांचे दि.२९/०८/२०२० रोजी निधन झालेले आहे.

मी श्रीमती इंदिरा संजय ठाकूर, पत्ता : अॅट-शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६. उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

याबाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या / प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**सही/-**
**उत्तराधिकाऱ्याचे नाव इंदिरा संजय ठाकूर**
**पत्ता : अॅट : शिवाजीनगर, पो.गव्हाण,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## महाविकास आघाडीकडून १७ डिसेंबरला महामोर्चा

धुळीस मिळत आहे. गुजरातची निवडणूक जिंकावी म्हणून महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवली. त्यामुळे महाराष्ट्राचा अपमान होत असल्याने आता महाराष्ट्राच्या शक्तीचं विराट दर्शन दाखवले पाहिजे. यासाठी जिजामाता उद्या ते आझाद मैदान असा हा विराट महामोर्चा निघणार आहे. महाराष्ट्राचा अपमान सहन होत नाही त्यांनी येथे एकत्र यावे. महाराष्ट्र द्रेशांना धडा शिकवण्यासाठी एकत्र यावे, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी सर्वांना केले आहे.

## दोन गावठी पिस्तुल चार काडतुसांसह एक आरोपी अटक

गावठी पिस्तुल चार जिवंत काडतुस असे ५७ हजार किमतीचा मुद्देमाल सापडून आल्याने आरोपी यशबीर चव्हाणला ताब्यात घेण्यात आले. त्याच्यावर कर्जत पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कायदा क. ३(१) २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यशबीर चव्हाण वर आज वर कर्जत पोलीस ठाण्यात तर पुणे येथील पिंपरी पोलीस ठाणे तसेच भोसरी पोलीस ठाणे येथे विविध कलमाखाली गुन्हे दाखल असल्याची माहिती आता समोर आली आहे. ही कारवाई दयानंद गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली धनाजी साठे, राजा पाटील, यशवंत झेमसे, जितेंद्र चव्हाण, विकास खैरनार, देवराम कोरम या पथकाने केली. कर्जत तालुक्यात एल सी बी च्या पथकाकडून आजवर असे अनेक गंभीर गुन्हे हे वेळीच उघड करून आरोपींना ताब्यात घेतले आहे.

मा.मुजावर साहेब कोर्ट

अॅड.प्रशांत म. भोईर

**जाहिर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६९८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१०/०१/२०२३

१) श्री.परेश अनिल म्हात्रे
२) श्री.आदेश अनिल म्हात्रे
३) श्रीमती.तृप्ती ज्ञोनश्वर म्हात्रे
४) कु.भुमिका ज्ञानेश्वर म्हात्रे
५) कु.विराज ज्ञानेश्वर म्हात्रे
(अर्जदार क्र.३ स्वतःकरिता व अर्जदार क्र. ४ व ५ यांची अज्ञान पालनकर्ती म्हणून)
सर्व रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.मोहन चांगू म्हात्रे हे दि.२३/०६/२०२२ रोजी फ्लॅट नं.१०१, प्लॉट नं.४८७, सेक्टर २४, उलवे नोड, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून त्यांच्या पत्नी कै.द्रौपदी मोहन म्हात्रे ह्या दि.२६/०१/१९९९ रोजी मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच कै.मोहन चांगू म्हात्रे यांच्या आई कै.मैनाबाई चांगू म्हात्रे ह्या सुमारे चाळीस वर्षापूर्वी मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्य आहेत. परंतु त्यांचे मृत्यूची नोंद कोणत्याही तत्सम कार्यालयात उपलब्ध नाही. कै.मोहन चांगू म्हात्रे यांचा मुलगा कै.अनिल मोहन म्हात्रे हे दि.०२/१०/१९९८ रोजी मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे व त्यांच्या पत्नी कै.सुनिता अनिल म्हात्रे ह्या दि.३०/१०/२०१४ रोजी मुंबई येथे मयत झाल्या असून कै.मोहन चांगू म्हात्रे यांची धाकटी मुले कै.सुनील मोहन म्हात्रे हे दि.२१/०८/२००० रोजी मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे अविवाहित मयत झाले असून कै.ज्ञानेश्वर मोहन म्हात्रे हे दि.२१/०२/२०२१ रोजी पॅरामाऊंट मेडीकल सर्विसेस प्रा.लि. पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ व २ हे कै.मोहन चांगू म्हात्रे यांचे नातू असून कै.अनिल मोहन म्हात्रे व कै.सुनिता अनिल म्हात्रे यांची मुले आहेत. तसेच अर्जदार क्र.३ ह्या कै.मोहन चांगू म्हात्रे यांच्या सून असून कै.ज्ञानेश्वर मोहन म्हात्रे यांच्या विधवा पत्नी आहेत. आणि अर्जदार क्र.४ व ५ ही कै.मोहन चांगू म्हात्रे यांची नातवंडे असून कै.ज्ञानेश्वर मोहन म्हात्रे व अर्जदार क्र.३ यांची मुले आहेत. सबब अर्जदार क्र.१ ते ५ हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत त्यांचे नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

अ) कै.मोहन चांगू म्हात्रे यांचे नावे असलेल्या मौजे : उलवे आणि तरघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | गावाचे नाव | यु.केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | उलवे | २८१ (१) | ९३ | १३ | ०-१०-० |
| २ | तरघर | १५३+१४७/२ | ७ | ७ Part | ०-३३-० |
| | | | १० | ६ Part | ०-१७-८ |

ब) कै.मोहन चांगू म्हात्रे यांचे नावे असलेल्या मौजे : उलवे, ग्रुप ग्रामपंचायत उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | गावाचे नाव | यु.केस नं. | सर्वेक्षण क्र. | घर क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | उलवे | ULV-ICIG-80 | UL-184, UL-186 | ७२ | ९९.८१ चौ.मी. |

वरील घर मिळकतीचे मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे सामाईक भूखंडाचे वाटप केलेले आहे.

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | २४ | ३८१ | ३०० चौ.मी. |

येणेप्रमाणे जमीन मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै.मोहन चांगू म्हात्रे यांस संपादीत जमिनीचे मोबदल्यात १२.५ टक्के व पुनःर्वसन व पुनःस्थापना योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार क्र.१ ते ५ यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२५/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गुन्नाल सो कोर्ट

प्रो.जमा.२-२५

अर्जदाराचे वकील
अॅड.राजेश सि. डाकी

**जाहिर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७३७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.११/०१/२०२३

कै.रमेश गजानन घरत (मयत) तर्फे वारस
१) श्रीमती.मंगळुबाई उर्फ मंगुबाई उर्फ मंगाबाई गजानन घरत
वय : ८५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
२) सौ.मोनिका विकी ठाकूर
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
३) सौ.जागृती स्वप्नील भोईर
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जसखार, ता.उरण, जि.रायगड
४) सौ.भावना सतीश घरत
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नवीन शेवे, ता.उरण, जि.रायगड
५) श्री.चंदन रमेश घरत
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.रमेश गजानन घरत हे दि.१४/१०/२००३ रोजी मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झाले आहेत. कै.रमेश गजानन घरत यांचे नावे असलेल्या मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ही शासनाने भूसंपादीत केलेल्या आहेत. त्या भूसंपादीत मिळकतीचे मोबदल्यात त्यांना सिडकोमार्फत १२.५ टक्के भूखंड योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | युनिट केस नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर ६/८२/८३ | २१ | ९ | ०-०४-३ |
| २ | नवघर १०४-८५/८६ | १४ | ४ | ०-०७-० |
| | | ५२ | ३ | ०-०२-४ |
| | | ५८ | २ | ०-०२-८ |
| | | ६० | ३ | ०-०१-१२ |
| | | ६१ | ६ | ०-०१-१२ |
| | | ६४ | २ | ०-०२-८ |
| | | १०४ | २ | ०-०३-४ |
| | | ११७ | २ | ०-०७-४ |
| | | १२१ | ८ | ०-०२-० |
| | | १२८ | ९ | ०-०८-८ |
| | | १३४ | ४ | ०-०७-४ |
| | | १७२ | ५ | ०-०३-१२ |
| | | २१६ | ६ | ०-०३-८ |
| | | २७३ | ६ | ०-०१-१२ |
| | | २८४ | ९ | ०-०२-८ |
| | | २८८ | १३ | ०-०३-४ |
| ३ | नवघर III-१०४/८३ | ८२ | १ | ०-११-४ |
| | | ९७ | ६ | ०-०३-५ |
| ४ | नवघर १०४ बी-८५/८६ | ११७ | १ | ०-०२-०० |
| | | ९ | ५ | ०-०७-०० |
| | | ५९ | १ | ०-००-०८ |
| | | २७९ | १३ | ०-०३-०० |
| | | २१७ | ९ | ०-०२-०० |
| | | २१७ | १३ | ०-०५-०८ |
| | | १० | ९ | ०-०१-१२ |
| | | २७३ | १४ अ | ०-००-०८ |
| ५ | नवघर १०३ -८५/८६ | २५ | ४ | ०-०२-५ |
| | | १०० | १४ | ०-०५-९ |

कै.रमेश गजानन घरत यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## १३ डिसेंबर रोजी कोकण विभागीय पेन्शन अदालत

**दै.रायगड नगरी । पेण**

कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि.१३ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ११.०० वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.

सदर पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदाल–तीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे उपायुक्त,(सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

## कोलाड विभागीय कबड्डी स्पर्धेत भुवण संघ ठरला अंतिम विजेता

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

कोलाड कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने व गावदेवी क्रीडा मंडळ बाहे यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या कोलाड विभागिय कबड्डी स्पर्धेत अंतिम सामन्यात भुवण संघाने सर्वोत्तम कामगिरी करून अंतिम विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेचै उद्घाटन ओबीसी समन्वय समितीचे अध्यक्ष अनंत थिटे व उद्योजक शंकर महाबळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.कबड्ढी खेळ व खेळाडू यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने कोलाड विभाग कबड्डी असोसिएशन यांच्या वतीने सदरचे कबड्डी सामने असोसिएशनशी संलग्न असणाऱ्या गावांमध्ये आयोजित करण्यात येत आहेत.त्याच उद्देशाने संपन्न करण्यात आलेल्या या स्पर्धेतील उपविजेतेपद पाटणूस संघाने पटकावले तर धाक्सूद चिल्हे व काळभैरव पाले ब या संघांना तृतीय आणि चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले. सामनावीर अमन साळवी भूवण, उत्कृष्ट चढाई सनी कोठेकर चिल्हे तर उत्कृष्ट पक्कड म्हणून करण म्हामूणकर पाटणूस यांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी गावदेवी क्रीडा मंडळ बाहे येथील सर्व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.



मे.गोडसे सो.यांचे कोर्ट

अ‍ॅड.प्रवीण प्र. पिसाळ
अर्जदारांचे वकील

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८१५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०१/२०२३

कै.दत्तात्रय रामचंद्र महाजन मयतचे वारस
१) श्रीमती.मैथिली दत्तात्रय महाजन
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बी–५, अवधूत को.ऑ.हौ.सोसायटी,
एम.पी.मार्ग, सावरकर चौक, परदेशी आळी,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
२) सौ.विभूती दत्तात्रय महाजन
वय : ३५ वर्षे, धंदा : डॉक्टर
रा.बी.८०२, वुडसिव्हील फेस ३, बोराडेवाडी,
गाईल इंडिया जवळ, मोशी, पुणे ४१२१०५
३) श्रीमती.सुरभी दत्तात्रय महाजन
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी–५, अवधूत को.ऑ.हौ.सोसायटी,
एम.पी.मार्ग, सावरकर चौक, परदेशी आळी,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ हे कै.दत्तात्रय रामचंद्र महाजन यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ ह्या मुली आहेत. कै.दत्तात्रय रामचंद्र महाजन यांचे दि.१५/१२/२००४ रोजी कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून कै.दत्तात्रेय रामचंद्र महाजन यांची आई कै.पदमिनी रामचंद्र महाजन यांचे निधन दि.१७/१२/२००३ रोजी विटा जि.सांगली येथे त्यांच्या गावी राहत्या घरी झाले असून श्रीमती.मैथिली दत्तात्रय महाजन व इतर २ ह्यांनी, कै.दत्तात्रय रामचंद्र महाजन यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

फ्लॅट नं.५, पहिला मजला, बी विंग, अवधूत को.ऑ.हौ.सोसायटी
क्षेत्र ५५४ चौ.फुट बिल्टअप एरिया
ता.पनवेल, जि.रायगड
सदर सदनिकेची एकूण किंमत रु.२,३५,४५०/–
(अक्षरी रक्कम रुपये दोन लाख पस्तीस हजार चारशे पन्नास मात्र)


वरील मिळकत ही कै.दत्तात्रय रामचंद्र महाजन यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.मैथिली दत्तात्रय महाजन व इतर २ हे कै. दत्तात्रय रामचंद्र महाजन यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.मैथिली दत्तात्रय महाजन व इतर २ यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.दत्तात्रय रामचंद्र महाजन यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०५/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्यावतीने पुतळा परिसराची स्वच्छता

**दै.रायगड नगरी । पनवेल**




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवरती पन–वेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या माध्यमातून पुतळापरिसराची स्वच्छता करण्यात आली.

पनवेल महानगरपालिकेने पनवेलमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसराचे सुशोभिकरण केले आहे. या ठिकाणी ६ डिसेंबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापारिनिर्वाण दिनादिवशी मोठी गर्दी होत असते. या पार्श्वभूमीवरती महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर पाण्याने स्वच्छ धुवून काढण्यात आला.

## भाजपा सरचिटणीस खेळु वाजे यांची अशोक लोखंडे विद्यामंदिर चेअरमनपदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । तळा**



तळा तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस खेळु दामू वाजे यांची अशोक लक्ष्मण लोखंडे विद्यामंदिर पिटसई चेअरमन पदी बिनविरोध नियुक्ती करण्यात आली आहे. खेळु वाजे हे गेली २५/३० वर्षे सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना त्यांनी अनेक लोकाभिमुख उपक्रम यशस्वीपणे पार पडले आहेत.

खेळु वाजे अशोक लक्ष्मण लोखंडे हायस्कूल येथे विश्वस्त म्हणून कार्यरत होते.अत्यंत मनमिळाऊ स्वभाव सदैव हसतमुख व सदैव मदतीस तत्पर असे खेळु वाजे यांना चेअरमन पदी नियुक्त होण्याचा मान प्रथमच मिळाला असल्यामुळेच सर्वांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

शेणवली ग्रामपंचायतचे माजी सरपंच, महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट तळा शाखा अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी तळा तालुका सरचिटणीस अशी विविध पदे भूषवीणारे वाजे यांच्यावर अशोक लोखंडे विद्यामंदिर चेअरमनपदी नियुक्ती करून जवाबदारी देण्यात आली आहे. दिलेल्या जवाबदारीला योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न करणार असून अशोक लोखंडे विद्यामंदिरच्या माध्यमातून उदयोन्मुख विद्यार्थी विद्यार्थिनी घडवून निसर्गाने नटलेल्या तळा तालुक्याचे नावलौकिक करणार असल्याचे खेळु वाजे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले. खेळु वाजे यांची अशोक लोखंडे विद्यामंदिर पीटसई चेअरमनपदी नियुक्ती झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदार यांचे वकील
अ‍ॅड.अर्चना म्हस्कर
अ‍ॅड.रजनी गोवारी

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८१८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०१/२०२३

१) श्री.महेंद्र गणपत गायकर
उ.व.३८, धंदा : व्यवसाय
२) श्री.नरेंद्र गणपत गायकर
उ.व.४१, धंदा : व्यवसाय
दोघेही रा.हनुमान मंदिराजवळ, कामोठे गाव,
सेक्टर १४, कामोठे, पनवेल, रायगड
३) श्रीमती.अंजली मधुकर घरत
उ.व.४८, धंदा : गृहिणी
घर नं.६२१, जुई गाव, मारुती मंदिराजवळ,
पोस्ट : कामोठे, पनवेल, रायगड
४) श्रीमती.सुवर्णा कमलाकर म्हात्रे
उ.व.३९, धंदा : गृहिणी
मु.पो.नेरे, साई मंदिराजवळ, पनवेल, रायगड
५) श्रीमती.सुभद्रा गणपत गायकर
उ.व.६२, धंदा : गृहिणी
रा.हनुमान मंदिराजवळ, कामोठे गाव,
सेक्टर १४, कामोठे, पनवेल, रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै. गणपत शंकर गायकर यांचे दि.१७/०५/२०१६ रोजी कामोठे येथे निधन झाले आहे. यांचे मालकीचे व ताबेकब्जातील मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | असेसमेंट रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | ४६३ | ६३२ | ३ | ०–४८–०६ | ४–०६ |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन

वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही कै.गणपत शंकर गायकर यांचे मालकीची व ताबेकब्जातील आहेत. कै.गणपत शंकर गायकर यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार क्रं.१ ते ५ यांचे नावे होण्यासाठी अर्जदार क्रं.१ ते ५ यांनी वारस दाखला मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै.गणपत शंकर गायकर यांना अर्जदार क्रं.१ ते ५ हेच सदर मिळकतीसंदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरितीने हरकती न घेतल्यास हे मा.न्यायालय अर्जदार १) श्री.महेंद्र गणपत गायकर, २) श्री.नरेंद्र गणपत गायकर, ३) श्रीमती.अंजलीम मधुकर घरत, ४) श्रीमती.सुवर्णा कमलाकर म्हात्रे, ५) श्रीमती.सुभद्रा गणपत गायकर हे कै.गणपत शंकर गायकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.५/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## हातचलाखीने एटीएम कार्ड बदलून केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हातचलाखीने एटीएम कार्ड काढून ताब्यात घेऊन त्या माध्यमातून ४१ हजार रुपये काढून फसवणूक केल्याचा प्रकार तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी अज्ञात चोरांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

इरफान अहमद अबीर अहमद चौधरी हे एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. या वेळी एटीएममध्ये दोन अनोळखी इसम आले व मदत करत असल्याचे भासवून इरफान यांचे एटीएम कार्ड मशीन टाकले व त्यांच्याकडून कार्डचा पिन नंबर घेतला. पैसे न १ निघाल्याने इरफान एटीएममधून बाहेर पडले.

काही वेळाने त्यांच्या मोबाइलवर ४१ हजार १६० रुपये काढल्याचा मेसेज आला. आपली फसवणूक झाल्याची समजताच याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

मा.गुन्नाल सो कोर्ट

प्रो.जमा.२–२५ अर्जदाराचे वकील
अ‍ॅड.राजेश सि. डाकी

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७३८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.११/०१/२०२३

कै.किशोर गजानन घरत मयत तर्फे वारस
१) श्री.हसुराम गजानन घरत
वय : ७१ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.ई–१, रुम नं.१०, ई–टाईप ओनर्स, असोसिएशन,
सेक्रेड हार्ट स्कूल जवळ, सेक्टर–४, वाशी,
नवी मुंबई, ठाणे–४००७०३
२) सौ.मालती शंकर कडू
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बोरी नाका, ब–१२, मोरा रोड, उरण,
ता.उरण, जि.रायगड, पिन–४००७०२
३) श्रीमती.मंगळुबाई उर्फ मंगुबाई उर्फ मंगाबाई गजानन घरत
वय : ८५ वर्षे, धंदा : गृहिणी,
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
४) कै.जनार्दन गजानन घरत (मयत) तर्फे वारस
४/१) कु.नितेश जनार्दन घरत
वय : ३३ वर्षे, धंदा : काही नाही
४/२) सौ.नयना राजेश पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
वरील क्र.४/१ ते ४/३ रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
४/३) सौ.लीना वरुन पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
५) कै.रमेश गजानन घरत (मयत) तर्फे वारस
५/१) सौ.मोनिका विकी ठाकूर
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
५/२) सौ.जागृती स्वप्नील भोईर
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जसखार, ता.उरण, जि.रायगड
५/३) सौ.भावना सतीश घरत
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नवीन शेवे, ता.उरण, जि.रायगड
५/४) श्री.चंदन रमेश घरत
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.किशोर गजानन घरत हे दि.११/१२/१९९१ रोजी मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे अविवाहित मयत झाले आहेत. कै.किशोर गजानन घरत यांचे नावे असलेल्या मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ही शासनाने भूसंपादीत केलेल्या आहेत. त्या भूसंपादीत मिळकतीचे मोबदल्यात त्यांना सिडकोमार्फत १२.५ टक्के भूखंड योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | युनिट केस नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर ६/८२/८३ | २१ | ९ | ०–०४–३ |
| २ | नवघर १०४–८५/८६ | १४ | ४ | ०–०७–० |
| | | ५२ | ३ | ०–०२–४ |
| | | ५८ | २ | ०–०२–८ |
| | | ६० | ३ | ०–०१–१२ |
| | | ६१ | ६ | ०–०१–१२ |
| | | ६४ | २ | ०–०२–८ |
| | | १०४ | २ | ०–०३–४ |
| | | ११७ | २ | ०–०७–४ |
| | | १२१ | ८ | ०–०२–० |
| | | १२८ | ९ | ०–०८–८ |
| | | १३४ | ४ | ०–०७–४ |
| | | १७२ | ५ | ०–०३–१२ |
| | | २१६ | ६ | ०–०३–८ |
| | | २७३ | ६ | ०–०१–१२ |
| | | २८४ | ९ | ०–०२–८ |
| | | २८८ | १३ | ०–०३–४ |
| ३ | नवघर III–१०४/८३ | ८२ | १ | ०–११–४ |
| | | ९७ | ६ | ०–०३–५ |
| ४ | नवघर १०४ बी–८५/८६ | ११७ | १ | ०–०२–०० |
| | | ९ | ५ | ०–०७–०० |
| | | ५९ | १ | ०–००–०८ |
| | | २७९ | १३ | ०–०३–०० |
| | | २१७ | ९ | ०–०२–०० |
| | | २१७ | १३ | ०–०५–०८ |
| | | १० | ९ | ०–०१–१२ |
| | | २७३ | १४ अ | ०–००–०८ |
| ५ | नवघर १०३ –८५/८६ | २५ | ४ | ०–०२–५ |
| | | १०० | १४ | ०–०५–९ |

कै.किशोर गजानन घरत यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गुन्नाल सो कोर्ट

प्रो.जमा.२–२५ अर्जदाराचे वकील
अ‍ॅड.राजेश सि. डाकी

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७३९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.११/०१/२०२३

कै.गजानन शंकर घरत मयत तर्फे वारस
१) श्री.हसुराम गजानन घरत
वय : ७१ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.ई–१, रुम नं.१०, ई–टाईप ओनर्स, असोसिएशन,
सेक्रेड हार्ट स्कूल जवळ, सेक्टर–४, वाशी,
नवी मुंबई, ठाणे–४००७०३
२) सौ.मालती शंकर कडू
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बोरी नाका, ब–१२, मोरा रोड, उरण,
ता.उरण, जि.रायगड, पिन–४००७०२
३) श्रीमती.मंगळुबाई उर्फ मंगुबाई उर्फ मंगाबाई गजानन घरत
वय : ८५ वर्षे, धंदा : गृहिणी,
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
४) कै.जनार्दन गजानन घरत (मयत) तर्फे वारस
४/१) श्रीमती.वनिता जनार्दन घरत
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
४/२) कु.नितेश जनार्दन घरत
वय : ३३ वर्षे, धंदा : काही नाही
४/३) सौ.नयना राजेश पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
वरील क्र.४/१ ते ४/३ रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
४/४) सौ.लीना वरुन पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
५) कै.रमेश गजानन घरत (मयत) तर्फे वारस
५/१) सौ.मोनिका विकी ठाकूर
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
५/२) सौ.जागृती स्वप्नील भोईर
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जसखार, ता.उरण, जि.रायगड
५/३) सौ.भावना सतीश घरत
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नवीन शेवे, ता.उरण, जि.रायगड
५/४) श्री.चंदन रमेश घरत
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.गजानन शंकर घरत हे दि.२२/१०/१९८४ रोजी मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.गजानन शंकर घरत यांचे नावे असलेल्या मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ही शासनाने भूसंपादीत केलेल्या आहेत. त्या भूसंपादीत मिळकतीचे मोबदल्यात त्यांना सिडकोमार्फत १२.५ टक्के भूखंड योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | युनिट केस नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर ६/८२/८३ | २१ | ९ | ०–०४–३ |
| २ | नवघर १०४–८५/८६ | १४ | ४ | ०–०७–० |
| | | ५२ | ३ | ०–०२–४ |
| | | ५८ | २ | ०–०२–८ |
| | | ६० | ३ | ०–०१–१२ |
| | | ६१ | ६ | ०–०१–१२ |
| | | ६४ | २ | ०–०२–८ |
| | | १०४ | २ | ०–०३–४ |
| | | ११७ | २ | ०–०७–४ |
| | | १२१ | ८ | ०–०२–० |
| | | १२८ | ९ | ०–०८–८ |
| | | १३४ | ४ | ०–०७–४ |
| | | १७२ | ५ | ०–०३–१२ |
| | | २१६ | ६ | ०–०३–८ |
| | | २७३ | ६ | ०–०१–१२ |
| | | २८४ | ९ | ०–०२–८ |
| | | २८८ | १३ | ०–०३–४ |
| ३ | नवघर III–१०४/८३ | ८२ | १ | ०–११–४ |
| | | ९७ | ६ | ०–०३–५ |
| ४ | नवघर १०४ बी–८५/८६ | ११७ | १ | ०–०२–०० |
| | | ९ | ५ | ०–०७–०० |
| | | ५९ | १ | ०–००–०८ |
| | | २७९ | १३ | ०–०३–०० |
| | | २१७ | ९ | ०–०२–०० |
| | | २१७ | १३ | ०–०५–०८ |
| | | १० | ९ | ०–०१–१२ |
| | | २७३ | १४ अ | ०–००–०८ |
| ५ | नवघर १०३ –८५/८६ | २५ | ४ | ०–०२–५ |
| | | १०० | १४ | ०–०५–९ |

कै.गजानन शंकर घरत यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## मिळगांव ठाकूरवाडी परिसरात आढळले अज्ञात महिलेचे प्रेत

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रामध्ये मिळगांव, ठाकूरवाडी परिसरातील दि. ५ डिसेंबर २०२२ रोजी कच्च्या रस्त्यालगत एका अनोळखी महिलेचे प्रेत सापडले असून डोक्यात दगड घालून अज्ञात आरोपीने तिची हत्या केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याठिकाणी मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांच्या लक्षातही बाब आली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सदर अनोळखी महिलेचे अंदाजे वय ५५ ते ६० वर्ष असून अंगात लाल रंगाचे स्वेटर व लाल रंगाची साडी आहे. गळ्यात काळ्या व पांढऱ्या रंगाचा स्कार्फ, हातात हिरव्या रंगाच्या तसेच पिवळ्या धातूच्या आर्टिफिशियल बांगड्या, कानात पिवळ्या रंगाचे झुमके, पायात पैजण तसेच पायाच्या बोटात जोडवी, उजव्या हातामध्ये तसेच उजव्या पायामध्ये काळा गंडा दोरा असल्याचे समजते. सदर महिलेबाबत कोणास काही माहिती मिळून आल्यास खोपोली पोलीस स्टेशनची संपर्क करावा, असे आवाहन खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी केले आहे.

## अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बांधला वनराई बंधारा

**दै.रायगड नगरी । तळा**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत 'चला जाणूया नदीला' या अभियानांतर्गत अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द विद्यालयातील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी उसर गावातील नदीवर शनिवार दिनांक ३ डिसेंबर २०२२ रोजी वनराई बंधारा बांधला. सदर कार्यक्रमासाठी शिक्षक आणि विद्यार्थी यांनी वनराई बंधाऱ्याचे नियोजन करून सकाळी ८ ते ११ या वेळेमध्ये वनराई बंधारा बांधून पूर्ण केला. यावेळी उसर ग्राम पंचायतीच्या सरपंच सौ. सायली संतोष घाग, ग्रामपंचायत सदस्या सौ. गीता गुजर तसेच माजी सैनिक श्री अनंत घाग व ग्रामस्थ उपस्थित होते. सरपंच सौ. सायली संतोष घाग, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ अंजली धारसे यांच्या हस्ते पूजा करून आणि श्री अनंत घाग यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून वनराई बंधाऱ्याचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी श्री मनोज सुतार सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत असताना 'चला जाणूया नदीला' या अभियानांतर्गत नदीचे महत्व, प्लॅस्टिक टाळा, कापडी पिशव्यांचा वापर करा, नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी मदत करा, शोष खड्ड्यांचा वापर करा, वनराई बंधारे बांधून झाडांची लागवड करा, शेतीला पूरक सेंद्रिय शेतीचा उपक्रम सुरू करा. अश्या अनेक उपक्रमांची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी हा वनराई बंधारा बांधून पूर्ण केला. बंधारा बांधल्यानंतर विद्यार्थ्यांना विद्यालया कडून अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. पर्यावरण संवर्धन व चला जाणूया नदीला या अभियानांतर्गत हा वनराई बंधारा बांधण्यात आला.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## बाळासाहेबांची शिवसेना पनवेल जिल्हा नवनिर्वाचित पदाधिकारी मेळावा दणक्यात

### एकाच वेळी ८० जणांना नियुक्ती पत्र; अनेकांचा पक्ष प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाचा आज नवीन पनवेल येथे नवनिर्वाचित पदाधिकारी मेळावा पार पडला. यावेळी ८० नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देऊन संघटना वाढीसाठी मार्गदर्शन करण्यात आले तसेच अनेकांनी पक्षात जाहीर प्रवेश केला.

या प्रसंगी पनवेल जिल्हा संपर्क प्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हा प्रमुख परेश पाटील, महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, शिवाजी थोरवे (शहर प्रमुख नवीन पनवेल खांदा कॉलनी), सुलक्षणा ताई जगदाळे, महानगर संघटक मंगेश रानवडे व इतर मान्यवर,पदाधिकारी व शेकडो शिवसैनिक बंधू - भगिनी उपस्थित होते.

## महिलेचे मंगळसूत्र केले लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात चोरट्याने मोटरसायकलवरून येऊन एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना खारघर वसाहती मध्ये घडली आहे. खारघर येथील शीतल वायभासे या आपल्या दुचाकीवर बसलेल्या असताना पाठीमागून मोटरसायकवरून आलेल्या दुचाकीस्वाराने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून पलायन करण्याचा प्रयत्न केला. वायभासे यांनी मंगळसूत्र वाचवण्याचा प्रयत्न केला असता ते तुटले व पाठीमागील कडीची बाजू त्याच्या हातात आली व अर्धे मंगळसूत्र घेऊन चोरट्याने पलायन केले.

## माथेरानमधील दोन पोलिस सन्मानित



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत असलेले दोन पोलिसांचा नवी मुंबई येथील महासंचालक कार्यालयात गुणात्मक अन्वेशनासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न या साठी सन्मानित करण्यात आले.

माथेरान पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हवालदार अरविंद ठाकूर व पोलीस कॉन्स्टेबल दामोदर खतेले यांना काल नवी मुंबई येथे त्यांनी राज्यात गाजलेल्या माथेरान मधील महिलेचा धडा विना शरीराच्या खून खटल्याचा बारा तासांच्या आत छडा लावण्यात दाखविलेल्या प्राविण्य साठी गौरविण्यात आले.

मा. विशेष पोलिस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र नवी मुंबई यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले यावेळी नेरळ चे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांनाही सन्मानित करण्यात आले.

## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेत फ्लाईंग राणीची बाजी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नवव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेत कलामंथन ठाणे संस्थेच्या फ्लाईंग राणी ने बाजी मारली. करंडकाचे विजेतेपद पटकावून बहुमानाचा अटल करंडक आणि ०१ लाख रुपये बक्षिसाचे ते मानकरी ठरले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या करंडक उत्सवात ज्येष्ठ कलावंत, रंगकर्मी जयंत सावरकर यांचा सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ व ५० हजार रुपये असे स्वरूप असलेल्या 'गौरव रंगभूमीचा' या पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने हि एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड तर सहप्रायोजक नील ग्रुप हे होते. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचा पारितोषिक वितरण सोहळा रविवारी (दि. ०४) रात्री शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडला.

यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, प्रसिद्ध लेखक, निर्माते व दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे, अभिनेते, लेखक व दिग्दर्शक अभिराम भडकमकर, अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक विजय गोखले, स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर विनोदी कलाकार पृथ्वीक प्रताप, अभिनेते भरत साळवे, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी उपमहापौर सीता पाटील, चारुशीला घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, दर्शना भोईर, रुचिता लोंढे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील, युवा मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहराध्यक्ष रोहित जगताप, ऍड. चेतन जाधव, अभिषेक भोपी, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, स्पर्धा सचिव व नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, अमोल खेर, चिन्मय समेळ, गणेश जगताप, अक्षया चितळे, संजीव कुलकर्णी, वैभव बुवा, निखिल गोरे, उमेश वाळके, प्रतीकेश मोरे, ओमकार सोष्टे आदी उपस्थित होते .

नाटय चळवळ वद्धींगत व्हावी व नाटय रसिकांना आपले नाटयाविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भार-ताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वद्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. रंगमंच आमचा... कलाविष्कार तुमचा हे ब्रीद वाक्य घेऊन गेली १५ वर्ष पनवेल मध्ये एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. आधी सात वर्ष ही स्पर्धा मल्हार करंडक या नावाने जिल्हास्तरीय स्वरूपात आयोजित केली जात होती. त्यानंतर या स्पर्धेला मिळणारा वाढता प्रतिसाद आणि राज्यभरातून नवोदित कलाकारांची मागणी लक्षात घेता. हि स्पर्धा राज्यस्तरीय झाली. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्य रसिकांच्या गळयातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे हि स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## कर्जत नगरपरिषद हद्दीतील विविध विकास कामांचे लोकार्पण सोहळा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील विविध विकास कामांचे लोकार्पण सोहळा आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते पार पडला.

कर्जत शहराच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, कर्जतच्या विकासासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यामातून ३६ कोटी रुपयांचा विकास निधी - नगरसेवक संकेत भासे यांनी आणला आहे. कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहीवली प्रभागातील विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा नगरसेवक संकेत भासे यांच्या वाढदिवस निम्मित पार पडला, यावेळी प्रभागातील १ कोटी ७५ लाखाच्या रुपयाच्या विकास कामाचं लोकार्पण सो-हळा पार पडला यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज गार्डन, साईनगर गार्डन, संजय नगर येथील रस्ता, बस थांबा , अंतर्गत रस्ते अश्या विविध कामाचं समावेश आहे.



यावेळी उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, संतोष भोईर, संपर्क प्रमुख पंकज पाटील, नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल,मुख्याधिकारी वैभव गारवे, बांधकाम सभापती राहुल डालिंबकर, नगरसेविका सुवर्णा निलधे, नगरसेविका मधुरा चंदन, नगरसेवक बळवंत घुमरे, नगरसेविका विशाखा जिनगरे , रमेश मते, शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, शहर अधिकारी सचिन भोईर, शहर संपर्क प्रमुख अभिजित मुधोळकर, ऋषभ लाड, उपशहर प्रमुख दिनेश कडू, विभाग प्रमुख विशाल बैलमारे, रमाकांत जाधव, दिलीप बोराडे , अजय सुवर्णे, डॉ वैद्य, डॉ म्हात्रे, भाऊ खानविलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## माथेरानमध्ये शिवसेनेच्या ठाकरे गटाला धक्का

### मुस्लीम मोहल्ल्यातील असंख्य कार्यकर्त्यांची शिंदे गटाकडे आगेकूच

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नगरपरिषदेच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत तसतसे इथले थंड वातावरण राजकीय दृष्टीने गरम होऊ लागले आहे. एकेकाळी एकत्रित असणाऱ्या राजकीय मंडळीने आगामी निवडणुकीवर लक्ष केंद्रित करून अन्य पक्षातील कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात खेचण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. सध्यातरी शिवसेनेच्या शिंदे गटाकडे तरुण कार्यकर्त्यांची गर्दी पहावयास मिळत आहे. शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी आणि उप शहरप्रमुख प्रमोद नायक यांच्यावर विश्वास ठेवून विविध प्रभागातील कार्यकर्ते शिंदे गटात स्वेच्छेने, बिनशर्त, कशाचीही अपेक्षा न बाळगता सामील होताना दिसत आहेत.

आज येथील शिवसेनेच्या ठाकरे गटातील मुस्लिम मोहल्ल्यातील असंख्य कार्यकर्त्यांनी शिंदे गटात जाहीरपणे प्रवेश केला आहे. हा छोटेखानी कार्यक्रम शिवसेना शाखेत पार पडला. यामध्ये अन्वर पटेल, राजू पटेल, आरिफ पटेल, आदिल पटेल, आलम मुजावर, जाकीर मुजावर, रियाज मुजावर, शफिक शेख, हमीद महापुळे, रियान मुजावर यांचा समावेश आहे या सर्वांचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी आणि प्रमोद नायक यांनी स्वागत केले. माथेरान मधील प्रत्येक वार्डातील कार्यकर्ते आमच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षात स्वखुशीने यायला इच्छुक आहेत. लवकरच मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांचा लवाजमा आपल्या शिंदे गटात समाविष्ट होणार आहे असे चंद्रकांत चौधरी यांनी सांगितले. यावेळी युवा सेनेचे निखिल शिंदे, गौरंग वाघेला, अनिकेत जाधव, जेष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे यासंह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.




### जाहिर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.२३६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०२/२०२३

कै.गिरीश शांताराम म्हात्रे मयत तर्फे वारस
१) श्रीमती.सुगंधा गिरीश म्हात्रे
वय : ३७ वर्षे, व्यव : गृहिणी
२) कु.जान्हवी गिरीश म्हात्रे
वय : १६ वर्षे, व्यव : शिक्षण
तर्फे अज्ञान पालनकर्ती आई
श्रीमती.सुगंधा गिरीश म्हात्रे
क्रं.५/१ व ५/२ दोघेही
रा.मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

अर्जदार क्रं.१ यांचे पती व २ यांचे वडील यांचे कै.गिरीश शांताराम म्हात्रे हे दि.१८/०४/२०१० रोजी मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच कै.गिरीश शांताराम म्हात्रे यांची आई कै.मथुराबाई शांताराम म्हात्रे ह्या दि.२८/०८/१९९७ रोजी मु.पो. जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.गिरीश शांताराम म्हात्रे हे मयत झाले आहेत. ते हयात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत होती व आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| जासई २०/९८ | १७७ | १ (१) | ००-०८-६० |
| जासई २/२००० | १६६ | १ | ००-१६-०० |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.गिरीश शांताराम म्हात्रे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०१/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**



मा.गुन्नाल सो। कोर्ट

प्रो.जमा.२-२५

अर्जदाराचे वकील
ॲड.राजेश सि. डाकी

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६९८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.११/०१/२०२३

कै.जनार्दन गजानन घरत (मयत) तर्फे वारस
१) श्रीमती.मंगळुबाई उर्फ मंगुबाई उर्फ
मंगाबाई गजानन घरत
वय : ८५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
२) श्रीमती.वनिता जनार्दन घरत
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
३) कु.नितेश जनार्दन घरत
वय : ३३ वर्षे, धंदा : काही नाही
४) सौ.नयना राजेश पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
वरील क्र.४/१ ते ४/३ रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड
५) सौ.लीना वरुन पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.जनार्दन गजानन घरत हे दि.२८/०७/२०२१ रोजी मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै. जनार्दन गजानन घरत यांचे नावे असलेल्या मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ही शासनाने भूसंपादीत केलेल्या आहेत. त्या भूसंपादीत मिळकतीचे मोबदल्यात त्यांना सिडकोमार्फत १२.५ टक्के भूखंड योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | युनिट केस नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर ६/८२/८३ | २१ | ९ | ०-०४-३ |
| २ | नवघर १०४-८५/८६ | १४ | ४ | ०-०७-० |
| | | ५२ | ३ | ०-०२-४ |
| | | ५८ | २ | ०-०२-८ |
| | | ६० | ३ | ०-०१-१२ |
| | | ६१ | ६ | ०-०१-१२ |
| | | ६४ | २ | ०-०२-८ |
| | | १०४ | २ | ०-०३-४ |
| | | ११७ | २ | ०-०७-४ |
| | | १२१ | ८ | ०-०२-० |
| | | १२८ | ९ | ०-०८-८ |
| | | १३४ | ४ | ०-०७-४ |
| | | १७२ | ५ | ०-०३-१२ |
| | | २१६ | ६ | ०-०३-८ |
| | | २७३ | ६ | ०-०१-१२ |
| | | २८४ | ९ | ०-०२-८ |
| | | २८८ | १३ | ०-०३-४ |
| ३ | नवघर III-१०४/८३ | ८२ | १ | ०-११-४ |
| | | ९७ | ६ | ०-०३-५ |
| ४ | नवघर १०४ बी-८५/८६ | ११७ | १ | ०-०२-०० |
| | | ९ | ५ | ०-०७-०० |
| | | ५९ | १ | ०-००-०८ |
| | | २७९ | १३ | ०-०३-०० |
| | | २१७ | ९ | ०-०२-०० |
| | | २१७ | १३ | ०-०५-०८ |
| | | १० | ९ | ०-०१-१२ |
| | | २७३ | १४ अ | ०-००-०८ |
| ५ | नवघर १०३ -८५/८६ | २५ | ४ | ०-०२-५ |
| | | १०० | १४ | ०-०५-९ |

कै.जनार्दन गजानन घरत यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर करावाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**